21 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठात मराठा इतिहास संशोधन परिषदेस प्रारंभ

# शिवरायांनी गुलामीची मानसिकता दूर केली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मराठ्यांत पिढ्यानपिढ्या रुजलेली गुलामीची मानसिकता दूर करून भूमिपुत्र म्हणून जबाबदारीची भूमिका बजावण्यासाठी त्यांनी सज्ज व्हावे, अशी छत्रपती शिवाजी महाराजांची भावना होती. मराठ्यांनी महाराजांची ही भावना सार्थ ठरविल्याचे पुढे सिद्ध झाले, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी बुधवारी केले. शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावर शिवाजी विद्यापीठात आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. या समारंभात 'शिवराज्याभिषेक' या विषयावर डॉ. पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी आयोजित मराठा इतिहास संशोधन राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी मार्गदर्शन केले. या वेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शाहू छत्रपती व हेमंत दळवी उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, महाराष्ट्रात राज्याभिषेकाची कोणतीही पूर्वपीठिका नसताना महाराजांना ही संकल्पना सुचणे ही देखील एक क्रांतिकारक घटना होती. राज्याभिषेकाची संकल्पना गागाभट्टाची मानणे गैर आहे. गागाभट्टाने महाराष्ट्रातील राज्याभिषेकाच्या विरोधकांना शांत करण्याचे महत्त्वाचे काम केले. 'श्री शिवराज्याभिषेक प्रयोगः' ही पुस्तिका निर्माण केल्याचे त्यांचे योगदान नाकारता येणार नाही. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूंविषयी संशोधन करण्यासाठी फेलोशिप देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्याचा लाभ इतिहासाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी घ्यावा. डॉ. नीलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले.


21 DEC 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज्याभिषेक महाराष्ट्राची तेजस्वी घटना

- डॉ. जयसिंगराव पवार
- राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवराज्याभिषेक ही महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी घटना आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी बुधवारी येथे केले. शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावरील तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. शाहू महाराज यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



कोल्हापूर : मराठा इतिहास संशोधन राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार. डावीकडून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शाहू महाराज, हेमंत दळवी.

डॉ. पवार म्हणाले, कृष्णाजी सभासद यांनी बखरीमध्ये नोंदविल्यानुसार, चोहो दिशांना सर्वत्र मुस्लिम शाह्यांचे राज्य असताना छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव मराठे राजे झाले. संभाजी महाराजांच्या माघारी मराठा स्वराज्य संपल्यातच जमा झाल्याचे वातावरण असताना मराठ्यांनी औरंगजेबासारख्या पातशहाला २६ वर्षे झुंजत ठेवले.

शाहू महाराज, कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. स्नेहल पाटील यांनी सूत्रसंचालन तर इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी उपस्थिती होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2023
पुण्यनगरी



कोल्हापूर : मराठा इतिहास संशोधन राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बीजभाषण करताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार. मंचावर कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज व उपसंचालक हेमंत दळवी.

# शिवराज्याभिषेक महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी घटना

## डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठात मराठा इतिहास संशोधन परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवराज्याभिषेक ही महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी घटना आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावरील तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन बुधवारी विद्यापीठात श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते झाले. या समारंभात 'शिवराज्याभिषेक' या विषयावर बीजभाषण करताना डॉ. पवार बोलत होते.

डॉ. पवार म्हणाले, महाराष्ट्रात राज्याभिषेकाची कोणतीही पूर्वपिठिका नसताना महाराजांना ही संकल्पना सुचणे ही देखील एक क्रांतीकारक घटना होती. त्यातून त्यांचे द्रष्टेपण अधोरेखित होते.

मराठ्यात पिढ्यानपिढ्या रुजलेली गुलामीची मानसिकता दूर करून भूमीपुत्र म्हणून जबाबदारीची भूमिका बजावण्यासाठी त्यांनी सज्ज व्हावे, अशी महाराजांची भावना आणि अपेक्षा होती. मराठ्यांनी महाराजांची ही भावना सार्थ ठरविल्याचे पुढे सिद्ध झाले. संभाजी महाराजांच्या माघारी मराठा स्वराज्य संपल्यातच जमा झाल्याचे वातावरण असताना मराठ्यांनी औरंगजेबासारख्या बादशहाला २६ वर्षे झुंजत ठेवले. ही साधी गोष्ट नव्हती. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, शिवराज्याभिषेक दिनाचा ३५० वा वर्धापन साजरा करण्यासाठी विद्यापीठ अनेकविध उपक्रम राबवित आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन योगदान द्यावे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूंविषयी संशोधन करण्यासाठी फेलोशीप देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी यांची उपस्थिती होती. डॉ. निलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल पाटील यांनी सूत्रसंचालन तर इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
21 DEC 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज्याभिषेक ही महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी घटना


## डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेचा प्रारंभ

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : 'छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही त्यांनी घडवून आणलेली मनो-राजकीय क्रांती आहे. शिवराज्याभिषेक ही महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी घटना आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले.

शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावरील तीनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्‍घाटन विद्यापीठात श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते झाले. यावेळी 'शिवराज्याभिषेक' या विषयावर डॉ. पवार यांचे बीजभाषण झाले.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी प्रमुख उपस्थित होते. डॉ. पवार म्हणाले, 'चोहो दिशांना सर्वत्र मुस्लिम शाह्यांचे राज्य असताना छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव मराठे राजे झाले, ही काही सामान्य बाब नव्हती. महाराष्ट्रात राज्याभिषेकाची कोणतीही पूर्वपिठिका नसताना महाराजांना ही संकल्पना सुचणे हीही एक क्रांतिकारक घटना होती. राज्याभिषेकाची संकल्पना गागाभट्टाची मानणे गैर आहे. गागाभट्टाने महाराष्ट्रातील राज्याभिषेकाच्या विरोधकांना शांत करण्याचे महत्त्वाचे काम केले आणि दुसरे म्हणजे 'श्री शिवराज्याभिषेक प्रयोगः' ही पुस्तिका निर्माण केली. हे त्याचे योगदान मात्र नाकारता येणार नाही.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी मराठा इतिहास संशोधन राष्ट्रीय परिषदेच्या उद्‍घाटन समारंभात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे बीजभाषण झाले. या वेळी डावीकडून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, हेमंत दळवी उपस्थित होते.

### मराठ्यांची भरारी

■ मराठ्यांत पिढ्यान्‌पिढ्या रुजलेली गुलामीची मानसिकता दूर करून भूमिपुत्र म्हणून जबाबदारीची भूमिका बजावण्यासाठी त्यांनी सज्ज व्हावे, अशी महाराजांची भावना आणि अपेक्षा होती. मराठ्यांनी ही भावना सार्थ ठरविली. त्यांनी फिनिक्सप्रमाणे भरारी मारत आपले लढवय्येपण सिद्ध केल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूंविषयी संशोधन करण्यासाठी फेलोशिप देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. मराठ्यांच्या महाराष्ट्राबाहेरील इतिहासाबाबतही संशोधन करण्याची गरज आहे.' डॉ. नीलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले. दरम्यान, या परिषदेच्या निमित्ताने विद्यापीठ संग्रहालय संकुलामध्ये शिवकालीन शस्त्रास्त्रांचे विशेष प्रदर्शन भरविले आहे.

21 DEC 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज्याभिषेक इतिहासातील तेजस्वी पर्व

## राष्ट्रीय परिषदेत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कृष्णाजी सभासद यांनी बखरीमध्ये नोंदविल्यानुसार, चोहो दिशांना सर्वत्र मुस्लीम शाह्यांचे राज्य असताना छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव मराठे राजे झाले, ही काही सामान्य बाब नव्हती. महाराष्ट्रात राज्याभिषेकाची कोणतीही पूर्वपिठिका नसताना महाराजांना ही संकल्पना सुचणे ही देखील एक क्रांतीकारक घटना होती. त्यामुळे शिवराज्याभिषेक ही महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी पर्व आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले.

शिवराज्यभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षनिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावरील तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन विद्यापीठात श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. या समारंभात 'शिवराज्याभिषेक' या विषयावर बीजभाषण करताना डॉ. पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित मराठा इतिहास संशोधन राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार. सोबत डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. अवनीश पाटील, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज व उपसंचालक हेमंत दळवी.

डॉ. पवार म्हणाले, राज्याभिषेकाची संकल्पना गागाभट्टाची मानणे गैर आहे. गागाभट्टाने महाराष्ट्रातील राज्याभिषेकाच्या विरोधकांना शांत करण्याचे महत्त्वाचे काम केले. 'श्री शिवराज्याभिषेक प्रयोग?' ही पुस्तिका निर्माण केली. हे त्याचे योगदान मात्र नाकारता येणार नाही. मराठ्यांत पिढ्यानपिढ्या रुजलेली गुलामीची मानसिकता दूर करून भूमीपुत्र म्हणून जबाबदारीची भूमिका बजावण्यासाठी त्यांनी सज्ज व्हावे, अशी महाराजांची भावना आणि अपेक्षा होती. मराठ्यांनी महाराजांची ही भावना सार्थ ठरविल्याचे पुढे सिद्ध झाले. संभाजी महाराजांच्या माघारी मराठा स्वराज्य संपल्यातच जमा झाल्याचे वातावरण असताना मराठ्यांनी औरंगजेबासारख्या पातशहाला २६ वर्षे झुंजत ठेवले. मराठ्यांनी फिनिक्सप्रमाणे भरारी मारत आपले लढवय्येपण सिद्ध केले. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी मराठा इतिहासाचा वेध घेणाऱ्या या परिषदेला उद्घाटनपर शुभेच्छा दिल्या.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवराज्याभिषेक दिनाचा ३५० वा वर्धापन दिनाच्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूंविषयी संशोधन करण्यासाठी फेलोशीप देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्याचा लाभ इतिहासाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी जरूर घ्यावा. डॉ. नीलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी, डॉ. मंजुश्री पवार, वसुधा पवार, डॉ. कविता गगराणी आदी उपस्थित होते.

21 DEC 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घुसखोरी करू पाहणाऱ्या चीनला सज्जड इशारा द्यावा

## डॉ. यशवंतराव थोरात : शिवाजी विद्यापीठात भारत-चीन संबंधावर राष्ट्रीय चर्चासत्र

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : भारत शांतताप्रिय देश आहे, हे खरे; मात्र घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, असा परखड शब्दांत चीनला सज्जड इशारा देण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी आणि नेहरू अभ्यास केंद्रातर्फे आयोजित 'भारत-चीन संबंध' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात त्यांचे बीजभाषण झाले. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, तर कर्नल शिव कुणाल वर्मा, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, डॉ. राहुल त्रिपाठी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते.

डॉ. थोरात यांनी भारत व चीन यांच्यातील १९५० ते १९६२ या कालावधीतील सहसंबंधांचा सूक्ष्म वेध घेतला. चीनच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षा प्रचंड आसुरी आहेत. भारतीय नियंत्रण रेषा उल्लंघून आत शिरण्यासाठी ते सातत्याने संधींच्या शोधात आहेत. त्यामुळे त्यांना सज्जड इशारा देण्याची आवश्यकता आहे. या इशाऱ्यामध्येही पुन्हा युद्धाच्या शक्यता आहेतच. पण, युद्ध हे सैन्याकडून लढले जात असले, तरी घडविले जाते ते नागरिकांकडून, ही गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी, असे त्यांनी सांगितले.

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'डॉ. थोरात यांनी मांडलेल्या दृष्टि कोनाशी अभ्यासकांचे मतभेद होण्याची शक्यता गृहित धरल्यानंतरही तिचे महत्त्व उरते. अवघे दहा टक्के सैन्यबळ आणि अपुरी युद्धसामग्री वापरून लढल्या गेलेल्या १९६२ च्या युद्धात आपला अल्पकाळासाठी पराभव झाला. पराभवाचे दुःख असले तरी भारत पुनश्च मुसंडी मारुन त्यामधून बाहेर पडला.'

नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी परिचय करून दिला. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

दरम्यान, चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार पवार यांनी १९६२ मधील युद्धाच्या परिणामांवर चर्चा केली. त्यात पंडित नेहरू आणि केनेडी यांच्यातील पत्रव्यवहार, सहकार्य, चीन-पाकिस्तानमधील वाढलेल्या मैत्रीचे भारत-चीन संबंधांवर झालेले परिणाम मांडले. युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारत, रशिया, चीनमधील बदललेले आयामांवर भाष्य केले.

अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. रविंद्र भणगे यांनी जागतिक व्यवस्थेत भारत-चीन संबंधांचा आढावा घेतला. दुसऱ्या सत्रात डॉ. त्रिपाठी, डॉ. सुखदेव उंदरे यांनी 'भारताचे परराष्ट्र धोरण' या विषयावर मांडणी केली. तिसऱ्या सत्रात डॉ. चौसाळकर 'भारत-चीन संबंधांतील समकालीन प्रवाह' या विषयावर मांडणी केली. डॉ. भारती पाटील सत्राध्यक्ष होत्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी 'भारत-चीन संबंध' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांचे बीजभाषण झाले. या वेळी डावीकडून डॉ. राहुल त्रिपाठी, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, डॉ. अशोक चौसाळकर, कर्नल शिवकुणाल वर्मा, डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

### भारताने दबाव निर्माण करावा

उद्घाटनानंतर कर्नल शिव कुणाल वर्मा यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार पवार होते. कर्नल वर्मा यांनी भारत-चीन संबंध आणि १९६२च्या युद्धातील अचर्चित पैलूंवर प्रकाश टाकला. भारत-चीन यांच्यातील संबंधांमध्ये अनेक ऐतिहासिक, सांस्कृतिक दुवे आहेत. परंतु या दोन्ही देश स्पर्धक सत्ता म्हणून उदयास येताना दिसतात. संरक्षणाच्या दृष्टीने भारताने पारंपरिक अस्त्रे सीमारेषांवर योग्य ठिकाणी स्थापित करून चीनवर दबाव निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

### संघर्ष सोडविण्यासाठी सर्व पातळीवर समन्वय हवा

■ अध्यक्षीय समारोपात ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार यांनी १९६२ मधील भारत-चीन युद्धातील पराभवाच्या कारणांचा आढावा घेतला. दोन्ही देशांसमोर भूक, उपासमार, गरिबी असे अनेक प्रश्न होते. मुलकी, सैनिकी नेतृत्वामधील समन्वयात कमतरता होती. मात्र, आता चीन एक तगडा शत्रू म्हणून उदयास आला आहे. त्याच्या बरोबरचा संघर्ष सोडवायचा असेल, तर आपल्या देशात राजकीय, सैनिकी या सर्व पातळ्यांवर समन्वय, प्रयत्न होणे आवश्यक आहे. नावीन्यपूर्ण तोडग्यांचा शोध घेतला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

21 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घुसखोरीवरून चीनला भारताने इशारा देण्याची गरज

## डॉ. यशवंतराव थोरात, विद्यापीठात 'भारत-चीन संबंध' विषयावर राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारत शांतताप्रिय देश आहे, हे खरे; मात्र घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, असा परखड शब्दांत चीनला इशारा देण्याचीही गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ तथा विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित 'भारत-चीन संबंध' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात बीजभाषण करताना ते बोलत होते.

डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले, नवस्वतंत्र, तिबेटशी भारताचे दोन हजार वर्षांचे धार्मिक संबंध होते, त्यावर केलेले अतिक्रमण, १९६० मध्ये दलाई लामांचे तिबेटकडून भारताकडे पलायन आणि त्यांचा पाठलाग करीत चीनी सैनिकांनी भारतात घुसखोरी केली. अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर भारत-चीन संबंधात कटुता येत जाऊन अखेरीस भारतावरील आक्रमणापर्यंत येऊन पोहोचले. यामागे चीनची विस्तारवादी सत्तालोलुपताही कारणीभूत आहे. या युद्धातील पराभव आपल्याला आजही झोंबणारा आहे.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, डॉ. थोरात यांनी मांडलेल्या दृष्टीकोनाशी अभ्यासकांचे मतभेद होण्याची शक्यता गृहित धरल्यानंतरही तिचे महत्त्व उरते. या युद्धात आपला अल्पकाळासाठी पराभव झाला. पराभवाचे दुःख असले तरी भारत पुनश्च मुसंडी मारुन त्यामधून बाहेर पडला, हेही वास्तव आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'भारत-चीन संबंध' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषण करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात. मंचावर डॉ. अशोक चौसाळकर व कर्नल शिव कुणाल वर्मा.

यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते. डॉ. जयश्री कांबळे यांनी परिचय करून दिला. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

यांनतर विविध सत्रे पार पडली. यामध्ये 'भारत-चीन संबंध' या विषयावर कर्नल शिव कुणाल वर्मा यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक श्रीराम पवार होते.

दुसऱ्या सत्रात डॉ. राहुल त्रिपाठी व डॉ. सुखदेव उंदरे यांनी 'भारताचे परराष्ट्र धोरण' या विषयावर मांडणी केली. डॉ. प्रल्हाद माने सत्राध्यक्ष होते. तिसऱ्या सत्रात डॉ. अशोक चौसाळकर 'भारत-चीन संबंधांतील समकालीन प्रवाह' या विषयावर मांडणी केली. डॉ. भारती पाटील सत्राध्यक्ष होत्या. श्रीराम पवार आणि डॉ. रविंद्र भणगे यांच्या उपस्थितीत समारोप सत्र झाले.

21 DEC 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चीनला परखड इशारा देण्याची गरज

## यशवंतराव थोरात : विद्यापीठात 'भारत-चीन संबंध' विषयावर परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारत शांतताप्रिय देश आहे हे खरे; मात्र घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दांत चीनला इशारा देण्याचीही गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी बुधवारी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित 'भारत-चीन संबंध' विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात बीजभाषण करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते.

डॉ. थोरात म्हणाले, चीन व पाकिस्तान हे केवळ आंतरराष्ट्रीय सहकारी नाहीत, तर मित्र आहेत. चीनच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षा प्रचंड आसुरी आहेत. भारतीय नियंत्रण रेषा उल्लंघून आत शिरण्यासाठी ते



संधींच्या शोधात आहेत. त्यामुळे त्यांना सज्जड इशारा देण्याची गरज आहे.

डॉ. चौसाळकर म्हणाले, १९६२च्या युद्धाची त्यांनी उलगडून दाखविलेली पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. अवघे दहा टक्के सैन्यबळ व अपुरी युद्धसामग्री वापरून लढल्या गेलेल्या युद्धात आपला पराभव झाला. पण भारत पुनश्च मुसंडी मारून त्यातून बाहेर पडला, हेही वास्तव आहे.

कर्नल शिव कुणाल वर्मा, डॉ. राहुल त्रिपाठी, डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते. डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी परिचय करून दिला. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

### चीन युद्धातील पराभव परराष्ट्र धोरणाचे अपयश

डॉ. थोरात म्हणाले, भारत-चीन युद्धातील पराभव झोंबणारा आहे. त्यावेळी आपल्या सैनिकांकडे शस्त्रसामग्री व साधनांची कमतरता होती. लोकशाहीत लष्कर एक साधन असते. त्याकडे १९५० ते १९६२ या काळात अक्षम्य दुर्लक्ष झाले. त्यावेळी आपले अपयश युद्धातील नव्हते, तर ते देशाचे आणि परराष्ट्र धोरणाचे अपयश होते.

21 DEC 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'चीनला परखड शब्दात इशारा देण्याची गरज'

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नवस्वतंत्र व प्रजासत्ताक अशा भारत व चीन यांच्यात १९५० मध्ये सुरवातीला मैत्रीपूर्ण संबंध राहिले. 'हिंदी-चीनी भाई भाई' म्हणण्याइतपत ही मैत्री होती. साम्राज्यवादी व वसाहतवादी सत्तेशी झगडून स्वातंत्र्य मिळविण्यात हे देश यशस्वी ठरले. भारत शांतताप्रिय देश आहे, मात्र घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, असा परखड शब्दांत चीनला इशारा देण्याचीही गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'भारत-चीन संबंध' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषणात ते बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'भारत-चीन संबंध' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात. सोबत डॉ. अशोक चौसाळकर व कर्नल शिव कुणाल वर्मा.**

डॉ. थोरात म्हणाले, आशिया आणि आफ्रिका खंडांतील अन्य देशही स्वतंत्र होत होते. त्यांचे नेतृत्व भारत व चीन करीत होते. पंडित नेहरू आणि माओ या दोन बलाढ्य व्यक्तीमत्त्वांमधून उद्भवलेला संघर्ष प्रत्यक्ष जीवनात प्रतिबिंबित झाला. १९५५ च्या बांडुंग परिषदेत नेहरूंनी माओ व चीनचा परिचय करून देण्याचे धारिष्ट्य दाखवले होते. चीनने भारतात केलेल्या घुसखोरीमुळे भारत-चीनमध्ये कटुता वाढत गेली. युद्ध हे सैन्याकडून लढले जात असले, तरी घडविले जाते ते नागरिकांकडून, ही गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी. शांततेची किंमत जवानांना असते. युद्धात ते देह ठेवतात, ते तुमच्या-आमच्या जीवनात शांतता नांदावी, यासाठी. या बाबीचे भान ठेवून आपण आंतरराष्ट्रीय संबंधात पुढे जायला हवे, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, डॉ. थोरात यांनी मांडलेल्या दृष्टीकोनाशी अभ्यासकांचे मतभेद होण्याची शक्यता गृहित धरल्यानंतरही तिचे महत्त्व उरते. १९६२ च्या युद्धाची त्यांनी उलगडून दाखविलेली पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. अवघे दहा टक्के सैन्यबळ आणि अपुरी युद्धसामग्री वापरून लढल्या गेलेल्या या युद्धात आपला अल्पकाळासाठी पराभव झाला. पराभवाचे दुःख असले तरी भारत पुनश्च मुसंडी मारुन त्यामधून बाहेर पडला, हेही वास्तव आहे.

तीन सत्रात कर्नल शिव कुणाल वर्मा, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, डॉ. राहुल त्रिपाठी, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. प्रल्हाद माने डॉ. भारती पाटील डॉ. रविंद्र भणगे आदींनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी परिचय करून दिला. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी कर्नल शिव कुणाल वर्मा, डॉ. राहुल त्रिपाठी, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक श्रीराम पवार, डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाची उद्या अधिसभा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची उद्या, शुक्रवारी अधिसभा (सिनेट) बैठक होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १२ वाजता होणाऱ्या या बैठकीत महत्त्वाचे विद्याविषयक धोरणात्मक ठराव येण्याची शक्यता आहे.

२२ नोव्हेंबर २०२२ रोजी विद्यापीठाची नवी सिनेट पाच वर्षांसाठी अस्तित्वात आली. त्यानंतर दहा मार्चला सिनेटची पहिली बैठक झाली. यात वार्षिक अंदाजपत्रक मंजुरीसह सदस्यांच्या ६६ ठरावांपैकी केवळ ४ सदस्य ठराव मंजूर झाले होते. त्यानंतर वार्षिक अहवालासाठी २५ मे ला सिनेटची विशेष बैठक झाली. या अहवालातील अक्षम्य चुकांमुळे ही बैठक वादळी झाली होती. उद्या, शुक्रवारी होणारी या वर्षातील दुसरी सिनेट आहे. या बैठकीत जुने विषय पुन्हा गाजण्याची चिन्हे आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2023
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाची अधिसभा उद्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा उद्या (दि. २२) वाजता राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. या अधिसभेत विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संशोधन, क्रीडा आदी विशायावर प्रश्न आणि ठराव मांडले जाणार आहेत. विद्यार्थी हित लक्षात घेवून क्रीडा विभाग, परीक्षेतील प्रश्न आणि नवीन शैक्षणिक धोरणावरही चर्चा होणार आहे. ही अधिसभा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. परिनियम व विनिमयाचे विद्यापीठाचे निदेश पुस्तक तयार आहे किंवा नाही, संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिपसाठी विद्यापीठ काय प्रयत्न करीत आहे. नवीन शिक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी काय प्रयत्न सुरू आहेत. आदी प्रश्न विचारले जाणार आहेत. विद्यापीठाने परीक्षा नियमावलीत संयुक्तीक बदल करावेत. एसआरपीडी कामकाजात दोषी असणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यात यावी. विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये नेटबॉल हा प्रकार सुरू करावा. आहारतज्ज्ञ व फिजिओ थेरपिस्टची कायमसवरूपी नेमणूक करण्यात यावी. मायग्रेशन सर्टीफिकेट मिळण्याबाबत अडचणी कमी व्हाव्यात. आदी ठराव मांडण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2023
लोकमत

# विद्यापीठात पहिला क्रमांक घेऊन आयुष्याचे 'गणित' केले सोपे

## येणेचवंडीच्या अर्चनाचे यश : हायस्कूलमध्ये लागली गणिताची आवड ; प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत यश

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** गणित अभ्यासातील असो की जीवनाचे.. ते कठीण समजून अनेक विद्यार्थी गर्भगळीत होतात. पण, तिला हायस्कूलमध्ये असतानाच गणिताची गोडी लागली. शिक्षकांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्याच्याशी संघर्ष करीत तिने चक्क शिवाजी विद्यापीठात गणित विषयात एमएस्सीमध्ये पहिला क्रमांक मिळवला. गडहिंग्लज तालुक्यातील छोट्याशा येणेचवंडीसारख्या दुर्गम खेड्यातून येऊन तिने लख्ख असे यश मिळवून आयुष्याचेही गणित सोपे केले. गुणवत्तेच्या जोरावर आता ती शाहू कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम करते. अर्चना आप्पासाहेब कुराडे असे तिचे नाव आहे.

गावातील प्राथमिक शाळेत मराठी माध्यमातून सातवीपर्यंत अर्चनाचे शिक्षण झाले. त्यानंतर तिने नंदनवाड येथील शिवराय हायस्कूलमध्ये दहावीपर्यंत शिक्षण घेतले. हायस्कूलमध्ये असतानाच तिला गणिताची गोडी लागली. राष्ट्रीयस्तरावरील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या परीक्षेमध्ये तिने यश मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरली. त्यानंतर दहावीत गणित विषयात १०० पैकी ९६ गुण मिळवि. पुढे ती गडहिंग्लजमधील शिवराज महाविद्यालयात बीएस्सी भाग दोनपर्यंत शिक्षण घेतले. पदवीच्या शेवटचे वर्ष डॉ. घाळी महाविद्यालयात केले. तिथे ८९ टक्के गुण मिळवत तिने पदवी मिळवली. त्यानंतर एमएस्सीसाठी शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेतला. जिद्द, नियोजनबद्ध अभ्यास करून विद्यापीठात गणितात पहिला क्रमांक मिळवला.

घरची परिस्थिती बेताची, पण आईवडिलांनी व भावाने खूप पाठबळ दिले. पण, त्यांनी घेतलेल्या कष्टाचे अर्चनाने पांग फेडल्याची भावना गावात आहे. परिस्थिती चांगली नाही, म्हणून ती रडत बसली नाही. त्याच्याशी दोन हात करीत राहिली.

### प्राध्यापिका व्हायचे आहे

अर्चना पीएच.डी., नेट, सेटची तयारी करीत आहे. तिला प्राध्यापिका व्हायचे आहे. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत शिवाजी विद्यापीठातून पहिला क्रमांक मिळवणारी ती गावातील पहिलीच मुलगी आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2023

पुण्यनगरी

# विद्यार्थ्यांची 'मधाचे गाव पाटगाव'ला भेट

**कोल्हापूर :** राष्ट्रीय पातळीवर गौरवलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील 'मधाचे गाव पाटगाव'ला शिवाजी विद्यापीठाचा मास कम्युनिकेशन तसेच पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाइन जर्नलिजमच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. जिल्हाधिकारी राहुल रेखावार व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तहसीलदार अश्विनी अडसूळ, ग्रामोद्योग अधिकारी श्रीकांत जौंजाळ यांच्या सहकार्याने या भेटीचे आयोजन केले होते. या अभ्यास दौऱ्यात विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, माहिती अधिकारी वृषाली पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ.प्रसाद ठाकूर तसेच विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी पाटगाव मध उत्पादक शेतकरी संस्थेचे अध्यक्ष वसंत वास्कर, सचिव विलास सोनवणे, संचालक महेश ढोकरे, सुभाष कदम यांच्यासह मध उत्पादक शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2023
लोकमत

# खुशबू मुजावरची स्पर्धेसाठी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रिदमिक जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थिनी खुशबू वहिदा मुजावर हिची निवड झाली. या स्पर्धा अमृतसर येथे होणार आहेत.

खुशबू विद्यापीठाच्या एम.ए. भाग १ राज्यशास्त्र विभागात शिक्षण घेत असून , तिला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे, अधिविभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश पोवार, पृथ्वीराज सरनाईक यांचे मार्गदर्शन लाभले.

21 DEC 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाजी महाविद्यालय विजेते

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : दौलतराव आहेर कॉलेज कऱ्हाड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेत येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने पारंपरिक प्रतिस्पर्धी न्यू कॉलेजवर विजय मिळवला. पेनल्टी शूटआउटवर कर्णधार प्रथमेश हेरेकर यांनी गोल रोखून विजेतेपद मिळविले.

तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यात एल. बी. एस. कॉलेज साताराला चार विरुद्ध शून्य गोलने हरवून अंतिम सामन्यात प्रवेश केला. 'शहाजी'च्या प्रभू पवार, स्वयम् साळोखे, रोहित पवार, शोएब बागवान, यश कांबळे, सिद्धार्थ पाटील, प्रथम भोसले, संकेत कांबळे यांनी चमकदार कामगिरी केली. विजेत्या संघाला संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जिमखानाप्रमुख डॉ. प्रशांत पाटील, प्रशिक्षक विश्वास मालेकर-कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेतील शहाजी महाविद्यालयाचा विजेता संघ.